



**प्रिय महिला अधिकारी व कर्मचारी भगिनींनो,**

आज जागतिक महिला दिन. स्त्री प्रत्येक काळात वंदनीय ठरलेली आहे, ते तिच्या कर्तृत्वाने. पृथ्वीच्या धर्माची सहनशीलता, तशीच तिची सर्जनशीलता, तीच शक्ती आणि तेवढीच गती. निसर्गाने दिलेल्या वरदानाने आणि अंगभूत कौशल्याने स्त्रीने जगावर प्रभाव टाकणारे कौतुकास्पद कार्य केले आहे. ती धैर्य आहे, ती देवी आहे. ती आई आहे आणि या संसारात सर्वांची सावलीही आहे. काळ कोणताही असो, सहजपणे कार्याला पेलणं आणि संकटांना झेलणं हा तिचा पिंड आहे. कठीणातील कठीण प्रसंगीही अवघ्या जगाला सावरण्याचे सामर्थ्य बाळगणारी ती, तिच्यापुढे आदराने नतमस्तक व्हावे अशीच. सक्षम जबाबदारीने वर्तमानालाही आधुनिकतेने कवेत घेऊन ती वाटचाल करीत आहे. तिच्या सामर्थ्याला सलाम करण्याचा हा दिवस.

माथा टेकवावा अशी ती माता आहे, जीव जडवावा अशी ती सखीही आहे. किती रुपे तिची. सर्वांचा भार वाहणारी आणि सर्वांना भारावून सोडणारीही. म्हणूनच, तिचा गौरव करणं हा सबंध मानवतेचा गौरव करण्यासारखं आहे. मातीचा गुणधर्म अंकुरांना वाढवणं आणि मातेचा गुणधर्म माणसाच्या संस्कृतीला वाढवणं. तिच्या सामर्थ्याला समजून घेणं आणि त्या सामर्थ्याला आदरानं प्रणाम करुन तिच्या समृद्ध जीवनसंघर्षाला अधिक उंच नेणं हेच जागतिक महिला दिनाचं औचित्य आहे.

आपल्या महापारेषण कंपनीतही महिला अधिकारी व कर्मचारी उत्कृष्टरीत्या सेवा बजावत आहेत. त्यांचे महिला दिनाच्या निमित्ताने मनापासून अभिनंदन. आपल्या कार्यक्षेत्रात तत्परतेने उत्कृष्ट कार्य करताना एका नेत्रदीपक आदर्श जीवनाचा साक्षात्कार त्यांच्या जीवनात दिसून येतो. प्रबळ इच्छाशक्ती, जिद्द, सचोटीने स्वत:ला त्यांनी सिद्ध केले आहे, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. ती मुळातच प्रकाशदात्री आहे.

**सर्व महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना**
**जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा !**

**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण